पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३१५ ■ बुधवार, दि. १२ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -315 ■ Saturday, 12 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## आता प्रार्थना स्थळ, मशिदीवरील भोंग्यावर होणार कारवाई; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा स्पष्ट इशारा

### यापुढे सरसकट परवानगी मिळणार नाही, भोंगे लावण्यासाठी पोलीस परवानगी आवश्यक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईसह महाराष्ट्रातील विविध भागातील प्रार्थना स्थळ, मशिदींवरील भोंग्यामुळे ध्वनी प्रदूषण ( होत असल्याचा मुद्दा विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी उपस्थित केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने २५ जानेवारी २०२५ रोजी आदेश देऊन मशिदींसह प्रार्थना स्थळांकडून ध्वनी प्रदूषण प्रतिबंध नियमांचे उल्लंघन होणार नाही, असे आदेश दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, हा मुद्दा भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी सुचनेद्वारे मांडला. उत्तर प्रदेश सरकारने ज्याप्रकारे भोंग्यावर कारवाई केली आहे, त्याप्रमाणे राज्य सरकारही कारवाई करणार का? असा प्रश्न आमदार फरांदे यांनी विचारला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कुठल्याही प्रार्थनास्थळावर भोंगे लावण्याआधी परवानगी घेतली पाहिजे. रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत भोंगे बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० वाजण्याच्या कालावधीत दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४४ डेसिबलची आवाज मर्यादा असली पाहिजे. कायद्यानुसार अधिक डेसिबलने भोंगे वाजत असतील तर त्यावर कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केंद्रीय कायद्याने दिले आहेत. पोलिसांनी याची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवायचे आहे, अशी सध्या कायद्याची तरतूद आहे. मात्र याचा अवलंब सध्या होताना दिसत नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, यापुढे कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देण्यात येणार नाही. निश्चित कालावधीकरताच भोंगे लावता येतील.

#### कडक कारवाईसाठी नियमात बदल करणार

प्रचलित कायद्यानुसार पोलिसांकडे फारसे अधिकार नाहीत. कारण कारवाईचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाला आहेत. त्यामुळे नियमांमध्येही काही प्रमाणात बदल करणे अपेक्षित आहे. हे बदल झाल्यास भोंग्यावर अधिक प्रभावी कारवाई करता येईल. यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून नियमांमध्ये बदल करण्यास सुचविले जाईल, असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

त्यानंतर पुन्हा भोंगे लावायचे असल्यास संबंधितांनी पुन्हा पोलिसांकडून परवानगी घ्यावी. ज्याठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल, त्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही. भोंग्यांची जप्ती केली जाईल. तसेच या नियमांचे तंतोतंत पालन होत आहे की नाही? हे पाहण्याची जबाबदारी पोलीस निरीक्षकाची असेल.

जर पोलीस निरीक्षकांनी याचे तंतोतंत पालन केले नाही, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधीचे उत्तर देताना स्पष्ट केले.

पोलीस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थना स्थळात जाऊन भोंग्याची परवानगी घेतली आहे की नाही? याची तपासणी केली पाहिजे. भोंग्याचे डेसिबल मोजून आवाजाची मर्यादा ओलांडली असेल तर पहिल्या टप्प्यात प्रदूषण नियंत्रक मंडळाला सांगणे आणि दुसऱ्या टप्प्यात पुन्हा परवानग्या न देण्याचा मार्ग अवलंबला पाहिजे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## दारूच्या दुकानासाठी 'एनओसी' बंधनकारक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गृहनिर्माण सोसायटी, शाळा, धार्मिक स्थळे, रुग्णालयासह रहिवाशी क्षेत्रात वाईन शॉप, बीअर शॉप, बार आणि रेस्टॉरंटला परवानगी देताना स्थानिक सोसायटीची 'एनओसी' बंधनकारक करण्यात येणार आहे. त्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी सोसायटींच्या आवारामध्ये लिकर शॉपलापरवानगी दिल्यामुळे सर्वसाम ान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत लक्षवेधी सूचना मांडली. त्यावर सभागृहात चर्चा झाली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध गृहप्रकल्प आहेत. त्यामधील कम र्शिअल दुकानांमध्ये लिकर शॉपचे 'मममममम) परवाने दिले जातात. सोसायटींच्या आवारामध्ये लिकर शॉप असल्यामुळे विद्यार्थी, माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक यांना त्रास होत आहे, अशा नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमानुसार, तक्रारी दिल्यानंतर दुकान बंद करण्यात येईल, असे म्हटले आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक सोसायटींच्या आवारात देशी दारु दुकान, वाईन शॉप, बीअर बार यांना परवाने दिले आहेत. अशा ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी नागरिक दारु पिण्यासाठी बसतात. अशा परवानाधारकांवर कारवाई करावी.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, १९७२ पासून नवीन लिकर परवाने दिलेले नाहीत. काही भागातील दुकानांना स्थलांतरीत करण्याचे प्रस्ताव येतात. त्याची तपासणी होते. नगरपालिकेचा ना हरकत दाखला, ग्रामीण भागात ग्रामसभेचा ठराव घेतला जातो. महानगरपालिका परिसरात नवीन सोसायट्यांच्या आवारात गाळे काढले जातात. त्या ठिकाणी मद्य दुकाने स्थलांतरीत करण्याबाबत नियमात तरतूद नाही. सोसायटीच्या गाळ्यामध्ये कोणती दुकाने असावीत, यासाठी नियमात सुधारणा करण्यात येतील. तसेच, लिकर दुकानाचे परवाने देताना सोसायटीधारकांची 'एनओसी' घेतली जाईल. त्यासाठी नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री पवार यांनी केली.

शाळा, कॉलेज, सोसायटी आणि धार्मिक स्थळांच्या आवारात लिकर परवाने किंवा दुकाने स्थलांतरीत करण्याबाबत राज्य शासन नियमावलीत बदल करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोसायटीधारकांच्या हितासाठी धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असे आश्वासन दिले होते. एखाद्या दारु दुकानाबाबत तक्रार असल्यास त्यामध्ये नागरिकांची मते घेवून दुकान बंद करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. राज्य शासनाने सोसायटीधारक व सर्वसामान्य नागरिकांसाठी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत करीत असल्याचे आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

## गुंतवणूकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्याबाबतच्या बैठकीचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर** – गुंतवणुकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक व उद्योजक, उद्योजक प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र व नांदेड परिक्षेत्र व पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर शहर यांच्या संयुक्त उपस्थितीत ८ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्यादित ऑरीक हॉल बिल्डींग, ऑरीक सिटी डीएमआयसी औद्योगिक क्षेत्र शेंद्रा ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांनी एकत्रित समन्वयेने आपल्या जिल्ह्यातील उद्योजक संघटना प्रमुख, सौर कृषी वाहिनी पवन ऊर्जा प्रकल्पधारक यामधील ठेकेदार व महावितरण अधिकारी व अन्य उद्योग संबंधित अधिकारी यांनाही उपस्थित रहाण्याबाबत आपले स्तरावरुन सुचित करण्याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## अर्थसंकल्पात आरोग्य विभागाच्या तोंडाला पुसली पाने! मागितले होते ११,७२८ कोटी मिळाले अवघे ३८२७ कोटी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आरोग्य विभागाला अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात निधी मिळाला पाहिजे हे प्रत्येक पक्ष मान्य करत असला तरी सत्तेवर आल्यानंतर प्रत्यक्षात अर्थसंकल्पात आरोग्य विभागाला निधी वाटपात तोंडाला पाने पुसली जात असल्याचे मागील काही वर्षातील चित्र यंदाच्या अर्थसंकल्पातही कायमच राहिले. यंदाच्या २०२५-२६च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागाने ११,७२८ कोटी रुपयांची मागणी केली होती मात्र प्रत्यक्षात अर्थमंत्री अजित पवार यांनी केवळ ३,८२७ कोटी रुपये आरोग्य विभागासाठी मंजूर केले. परिणामी आरोग्य विभागाचे नवीन उपक्रम राबविणे दूरच राहिले आहे त्या योजनांसाठी खर्च कसा करायचा हा प्रश्न आरोग्य विभागापुढे निर्माण झाला आहे.

पायाभूत सुविधांसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करणारे अर्थमंत्री गोरगरीबांच्या आरोग्यासाठी अपुरी तरतूद कशी करू शकतात, असा सवाल आरोग्य विभागातील ज्येष्ठ डॉक्टरांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

जी परिस्थिती आरोग्य विभागाची तशीच परिस्थिती वैद्यकीय शिक्षण विभागाची असून अर्थसंकल्पात वैद्यकीय शिक्षण विभागासाठी अत्यंत अपुरी तरतूद करण्यात आली आहे. सरकारने अट्टाहासाने प्रत्येक जिल्ह्यात एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला. यानुसार आजघडीला राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असून यासाठी अर्थसंकल्पात तरतूद मात्र अवघी २,५१७ कोटी रुपये करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या नीती आयोगाने राज्याच्या अर्थसंकल्पापैकी आठ टक्के रक्कम आरोग्याला मिळायला पाहिजे अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे. तत्कालीन मुख्यमत्री एकनाथ शिंदे यांनीही आरोग्य विभागाचा अर्थसंकल्प हा दुप्पट असला पाहिजे अशी भूमिका जाहीरपणे घेतली होती. प्रत्यक्षात त्यांच्याही काळात आरोग्य विभागाला पुरेसा निधी देण्यात आला नव्हता.

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागाला ३७१२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते.त्यात यंदाच्या अर्थसंकल्पात केवळ ११५ कोटी रुपयांची वाढ देण्यात आली आहे. परिणामी महात्मा फुले योजना, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना तसेच आरोग्य विभागाच्या विविध विद्यमान योजना राबवायच्या कशा असा सवाल आरोग्य विभागाच्या डॉक्टरांकडून उपस्थित करण्यात येत आहे. आरोग्य विभागाने राज्यात दोन नवीन कॅन्सर हॉस्पिटल सुरु करण्याची योजना नव्याने मांडली होती. त्याचप्रमाणे राज्यात तीन ठिकाणी संदर्भीय रुग्णालये सुरु करण्याचे निश्चित केले होते.

## कौशल्य विकास, उद्योजकता आणि नाविन्यता विभागातील लोकाभिमुख योजनांना चालना देणारा अर्थसंकल्प - मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडलेला २०२५-२६ चा अर्थसंकल्प महाराष्ट्राला प्रगतीच्या नव्या उंचीवर घेऊन जाणारा आहे. विकासाची गंगा समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविणारा हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक असा असून अर्थसंकल्पामध्ये रोजगार निर्मितीवर देण्यात आला असल्याचे मत कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केले. मंत्री लोढा म्हणाले की, नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये राज्य अग्रेसर व्हावे, यासाठी नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार आहे. त्यातून हजारो तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. AI चे प्रशिक्षण देऊन महिलांना उद्योग आणि रोजगाराच्या नव्या संधी जगभरात उपलब्ध होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## शासनाच्या सर्व विभागांची माहिती 'सीएम डॅश बोर्ड'वर लवकरच उपलब्ध - मुख्यमंत्री

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासनाच्या सर्व विभागांची माहिती जनतेला 'सीएम डॅश बोर्डवर' लवकरच उपलब्ध होईल यामध्ये न्यायालय,रेरा तसेच कायदा व सुव्यवस्था या सेवांचाही समावेश करावा, 'स्वॅस' या माहिती तंत्रज्ञान विभाग अधिकृत प्रणालीमध्ये ३४ विभागांच्या संकेतस्थळाच्या सेवांबरोबर शासनाच्या सर्व विभागांचाही लवकर समावेश करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवन येथे सीएम डॅशबोर्ड सादरीकरणासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन-नैनुटिया, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, संचालक अनिल भंडारी यासह आयटी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्या हस्ते 'सीएम डॅश बोर्ड' संकेतस्थळ आणि 'स्वॅस' माहिती प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,जनतेला कोणत्याही योजनांची माहिती तात्काळ एकाच संकेतस्थळावर मिळावी यासाठी सीएम डॅश बोर्ड जनतेला उपयुक्त ठरावा. शासनाच्या धोरणात्मक योजना, त्यांची प्रगती आणि सद्यस्थिती, अद्ययावत माहिती, केंद्र व राज्य शासनाच्या योजना, थेट आर्थिक लाभ देणाऱ्या योजना, विभागनिहाय माहिती यामध्ये असावी यासाठी इतर कोणत्याही संकेतस्थळावर जाण्याची गरज भासू नये. यामध्ये न्यायालय, कायदा व सुव्यवस्था तसेच रेराची देखील माहिती असावी. **htts:// cmdashboard. maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर जनतेला शासनाच्या सर्व विभागांची माहिती लवकरच उपलब्ध होणार आहे. हे संकेतस्थळ दिव्यांगानाही सहज हाताळता येणार असून माहितीचा अधिकार देखील यावर उपलब्ध असेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माहिती तंत्रज्ञान विभागातंर्गत राष्ट्रीय सूचना केंद्राची 'स्वॅस' ही प्रणाली आहे.या प्रणालीमध्ये राज्यातील ३४ संकेतस्थळांचा समावेश आहे यामध्ये इतर विभागांच्या संकेतस्थळांचाही समावेश वाढवा.ही प्रणाली सुरक्षित असून सहजरित्या एकाच ठिकाणी उपलब्ध असून स्मार्ट फोन व संगणकावरही नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन-नैनुटिया यांनी माहिती तंत्रज्ञान विभाग हा 'सीएम डॅश बोर्ड व 'स्वॅस' ही प्रणाली सातत्याने अद्यावत करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले.

# बिहारमध्ये भाजप हाच मोठा भाऊ

बिहारमध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये तिथल्या विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. असे असले, तरी आतापासून प्रचार जोरात सुरू आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात बिहारसाठी केलेल्या तरतुदी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भागलपूर दौरा आणि जाहीर केलेल्या घोषणा पाहता हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्लीनंतर आता बिहार हे 'एनडीए'चे लक्ष्य असल्याचे दिसते. जागावाटपाबाबत काँग्रेस आणि मित्रपक्षांना अडचणी येणार आहेत. 'एनडीए'ने नुकत्याच दिलेल्या कल्याणकारी आश्वासनांमुळे बिहारचे राजकीय चित्र बदलू शकते. 'इंडिया' आघाडी आणि 'एनडीए' या दोन्ही आघाड्यांसमोर अंतर्गत आणि बाह्य आव्हाने आहेत. बिहारच्या विकासात केंद्राच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सात महिन्यांच्या कालावधीमध्ये सादर केलेल्या दोन केंद्रीय अर्थसंकल्पांमध्ये बिहारसाठी पायाभूत सुविधा गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली. यामध्ये महामार्ग, विमानतळ, पूरनियंत्रण आणि पर्यटन विकास यांचा समावेश आहे. यावरून नितीशकुमार यांच्या दोन दशकांच्या कारकिर्दीत राज्यासमोरील विकासासंबंधीची आव्हाने सोडवली गेली नसल्याचे स्पष्ट होते. बिहारला विशेष दर्जा देण्यास केंद्र सरकारने नकार दिला आहे. यामुळे राज्याच्या प्रकल्पांमध्ये केंद्राचे योगदान ६० टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत वाढले असते. यावरून केंद्र सरकारचे औदार्य लक्षवेधी असल्याचे दिसून येते.

बिहारमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये भाजपचा पसारा वाढला. २०१० मध्ये येथे संयुक्त जनता दलाने ११५ जागा जिंकल्या होत्या. भाजपने तेव्हा ९१ जागा जिंकल्या. ही त्यांची आजपर्यंतची सर्वोत्तम कामगिरी होती. २०१५ पर्यंत भाजपला सर्वाधिक मते मिळाली. ती एकूण मतांच्या जवळपास एक चतुर्थांश आहेत. ही वाढ इतर पक्षांच्या मतांची टक्केवारी कमी झाल्यामुळे झाली. या निवडणुकीत संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दलाने अधिक जागा जिंकल्या आणि अल्पायुषी महाआघाडीचे सरकार स्थापन केले. यानंतर भाजप आणि संयुक्त जनता दल पुन्हा एकत्र आले. २०२० पर्यंत परिस्थिती बदलली. भाजपने ११० जागा लढवून ७४ जागा जिंकल्या, तर संयुक्त जनता दलाने ११५ जागा लढवून ४३ जागा जिंकल्या. संयुक्त जनता दलाच्या इतिहासात ही सर्वात वाईट कामगिरी होती. गेल्या दशकात नितीशकुमार यांच्या राजकीय भूमिकेवर भाजपच्या उदयाचा परिणाम झाला, हे उघड गुपित आहे. सर्वाधिक काळ बिहारचे मुख्यमंत्री राहिलेले नितीशकुमार यांना भाजप किंवा राष्ट्रीय जनात दलाच्या खाली दुसऱ्या क्रमांकावर राहायचे नाही. म्हणूनच ते खुर्चीला चिकटलेले आहेत. बिहारच्या अत्यंत स्पर्धात्मक निवडणुकांमध्ये जिथे कोणत्याही पक्षाला एकूण मतांच्या एक चतुर्थांश मतेही मिळत नाहीत, तिथे वारंवार बदलणाऱ्या भूमिकांवर नितीश यांचे अस्तित्व अवलंबून आहे. भाजप पुढे सरकतो, तेव्हा ते राष्ट्रीय जनता दलाकडे वळतात. राष्ट्रीय जनता दलाने डोळे वटारताच ते पुन्हा 'एनडीए'मध्ये येतात. दरडोई उत्पन्नामध्ये सातत्याने खालच्या क्रमांकावर असलेल्या बिहारमध्ये कोणत्याही एका पक्षाला गेल्या काही वर्षांमध्ये बहुमत मिळालेले नाही. महाराष्ट्राप्रमाणे तिथेही आघाडी किंवा युतीचे राज्य येते. राज्यातील नेत्यांच्या राजकीय नाटकामुळे आश्चर्यचकित आणि नाराज झालेले मतदार निवडून आलेल्या प्रतिनिधींकडून अधिक अपेक्षा करतात. 'इंडिया' आघाडी सार्वजनिक कल्याणावर भर देते, तर पायाभूत सुविधांची निर्मिती हा 'एनडीए'च्या कल्याणकारी कार्याचा आधारस्तंभ आहे. बिहारला या दोन्हींची गरज आहे. या पार्श्वभूमीवर दोन केंद्रीय अर्थसंकल्पांनी भाजपला बिहारमध्ये धोरणात्मक फायदा देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्ण बहुमताने जिंकून राज्याला पक्षाचा पहिला मुख्यमंत्री देण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र, हरियाणा, दिल्लीच्या निवडणूक निकालांनी भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे. कमी जागा लढवूनही निर्णायक निकालातही भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येऊ शकतो. राजकीय दबावाखाली काही राज्यांमधील पक्षांचे विभाजन करून भाजप बहुमताच्या जवळ आला. त्यात महाराष्ट्राचे उदाहरण घेता येते. ते नितीशकुमार यांच्या मनात असेल. २०२० च्या तुलनेत या वेळी जागावाटप खूप कठीण होणार आहे. गेल्या वेळचा ११५:११० हा फॉर्म्युला कामी येण्याची शक्यता नाही. २४३ जागांपैकी भाजप स्वबळावर किंवा छोट्या पक्षांसोबत सरकार स्थापन करण्याची शक्यता वाढवण्यासाठी १४० किंवा त्याहून अधिक जागांवर दावा करू शकते. नितीशकुमार यांना आता त्यांच्या पर्यायांचा काळजीपूर्वक विचार करावा लागेल. त्यांचे दीर्घकाळचे मित्र सुशीलकुमार मोदी यांच्या निधनाने ते भाजपपासून आणखी दूर झाले आहेत. गेल्या वर्षी ओडिशामध्ये घडल्याप्रमाणे विकास-केंद्रित प्रशासनाचे नवीन मॉडेल निवडणूक अनुनयाच्या घोषणांपेक्षा अधिक लक्ष वेधून घेईल. जातीय युती आणि महिला मतदार अजूनही निवडणुकीतील यशाची गुरुकिल्ली असू शकतात.

# नापासांची दोन महिन्यात पुनर्परीक्षा!

**(पाचवी व आठवीच्या परीक्षा आणि नापासची भिती विशेष.)**

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करायचे असेल, तर गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे. पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल. शिक्षण विभाग बिनकामाचे नियम निर्गमित करून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे माथे भडकून घेते, त्यातून काही एक साध्य होत नाही. हा नेहम ीचाच उपद्रव झाला आहे; ज्याला विभाग नवीन प्रयोग असे गोजिरवाणे संबोधन लावत असतो. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्याचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे, असे दिसते. ते सूर्यप्रकाशात स्पष्टपणे पुढे दिसणारच आहे. सुधारित नियमांनुसार इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची विहित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या बालकाला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. नेहमीप्रमाणे डोकेदुखी पाठ सोडणारच कशी? यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल. विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असाही दिलासा दिला जात आहे. पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता. परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू होणार असेल, तर त्याचे स्वागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासही मदत होईल, असा शेवटी सकारात्मक विचार करणेच महत्वाचा ठरतो, हेच खरे!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाचवी ते आठवीच्या परीक्षांत नापासही केले जाणार, अशी नुसतीच भिती दाखविली जात आहे, मात्र प्रत्यक्षात तो पहिल्याच प्रयत्नात पास होईल, यासाठी शाळा प्रयत्नशील असेल, हे निश्चित! पाचवीला ५० गुणांची, तर आठवीला ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल, असे म्हटले जाते. राज्याच्या रिकामटेकड्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे. यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणा□या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे. यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणा□या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे.

आगाऊ प्रयोगशील महाराष्ट्र राज्यात २०१०-११पासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली. त्यानुसार मूल्यमापनामध्ये 'ड' श्रेणी मिळालेल्या अथवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता त्यांनाही पुढील वर्गात प्रवेश दिला जात होता. मात्र त्यातून विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होते. तसेच विद्यार्थ्यांना वयानुरूप प्रवेश द्यायचा असल्याने त्यांना मागील वर्गातील अध्ययन कौशल्य अपेक्षित प्रमाणात मिळाली नसली तरी त्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा लागत होता. त्यातून मुलांच्या पुढील अध्ययनात अडथळा येत असे. या पार्श्वभूमीवर आता इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. तर आठवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा दुस□या सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण मिळवावे लागतील. मात्र विद्यार्थी नापास झाल्यास त्यांना शाळेतील शिक्षकांकडून अतिरिक्त पूरक मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यानंतर या विद्यार्थ्यांची जून महिन्यामध्ये पुन्हा परीक्षा घेतली जाणार आहे. या पुनर्परीक्षेतही अनुत्तीर्ण होणा□या विद्यार्थ्यांना पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. नव्या बदलामुळे विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी किमान अपेक्षित अध्ययन कौशल्य प्राप्त केले की नाही, याची खात्री करता येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावण्यासह पुढील शैक्षणिक आव्हाने आणि स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्याचा उद्देश असल्याचे सरकारकडून नव्या निर्णयाचे समर्थन करताना सांगण्यात आले आहे, बघुया, किती प्रभाव दिसतो ते!

राज्य सरकारने या परीक्षांचे सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, केंद्र स्तरावर सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे. या परीक्षा शाळास्तरावर घेतल्या जाणार आहेत. मात्र परीक्षांवेळी केंद्रस्तरीय भरारी पथके तयार करून शाळांना भेटी दिल्या जाणार आहेत. त्यानुसार या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असल्याची काळजी घेतली जाणार आहे. पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुसार थेट प्रवेश दिला जाणार आहे. मात्र सहावी ते आठवी इयत्तेच्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांना पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणा□या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणावेसे वाटते, की 'एक ना धड; भाराभर चिंध्या!'

!! सर्व विद्यार्थी मित्रांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षणासाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

# पाण्याचे व्यवस्थापन गरजेचे -जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नैसर्गिक स्रोत लक्षात घेऊन पाण्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. एखाद्याने आर्थिक उधळपट्टी केली तर आपण पाण्यासारखा पैसा खर्च केला असे म्हणतो. आता पुढील काळात पैशासारखे तोलूनमापून पाणी खर्च करा असे म्हणावे लागेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. दिलीप स्वामी यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि संशोधन संस्था व मालवीय मिशन टीचर्स ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आज मराठवाडा पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले. नाट्यगृहात आयोजीत या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संशोधन संस्थेचे संचालक डॉ उपेंद्र कुलकर्णी,प्रा. संजय सांळुके व मालवीय मिशन टीचर्स ट्रेनिंग सेंटरचे संचालक प्रा.सतीश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्र-कुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, जलदूत किशोर शितोळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.दिलीप स्वामी म्हणाले, निसर्गाने माणसाला उपलब्ध करुन दिलेल्या जसे की जल, भूमी, झाडे या बाबींकडे म ाणसाचे दुर्लक्ष होत आहे. नैसर्गिक स्त्रोत विचारात घेऊन पाण्याचे व्यवस्थापन केले पाहिजे. विशेषतः घरगुती वापरासाठी तोलून मापून पाणी वापरले पाहिजे. गेल्या काही वर्षात शासन, सेवाभावी संस्था, विद्यापीठे एकत्रित येऊन जल-भूमी यावर उत्तम कार्य करीत असल्याचेही स्वामी यांनी सांगितले. पाण्याच्या व्यवस्थापनासोबत गावोगावी वडाची झाडे लावण्याचा उपक्रम राबविण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'पाणलोट विकासाची तत्वे - लेखक - डॉ.सतीश पाटील व डॉ.चंद्रशेखर पवार, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण उपजीविकेवर बांबू शेतीचा सामाजिक, आर्थिक प्रभाव (संशोधन प्रकल्पाचे पुस्तक) - डॉ.संजय साळुंके, जलव्यवस्थापन महाराष्ट्राच्या शाश्वत विकासाचा ध्यास लेखक - डॉ.डी.बी.पानसकर या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. उपेंद्र कुलकर्णी व डॉ.उषा वाटाणे यांनी पुस्तकावर भाष्य केले.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले, निसर्गावर मात करण्याच्या वृत्तीमुळे निर्सगाचा ऱ्हास होत आहे. जलयुक्त शिवार, जलयुक्त गाव आदी उपक्रमांमुळे पाणी बचतीचे महत्व अधोरेखित झाले. 'जीएम एनआरडी'च्या वतीने राबविण्यात येत असलेले उपक्रम व अभ्यासक्रमांची माहिती डॉ.संजय साळुंके यांनी प्रास्ताविकात दिली. तर पाणी परिषदेच्या अहवाल राज्यशासनास पाठविण्यात यें ईल, असे डॉ.सतीश पाटील यांनी सांगितले.

प्रारंभी रोपांना पाणी घालून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ.मुस्तजिब खान सांनी सूत्रसंचालन प्रा.शैलेश माकणीवकर यांनी आभार मानले. समारोप्रसंगी माजी न्यायमूर्ती अंबादास जोशी, कुलपती नामनिर्देशीत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप यांची प्रमुख होती. या परिषदेत दिवसभरात संशोधक, विद्यार्थी, अभ्यासक, संस्थांचे प्रतिनिधी अशा एक हजारहून अधिक प्रतिनिधींचा सहभाग राहिला.

या परिषदेत दिवसभर चार सत्रात मंथन करण्यात आले यामध्ये भास्कर मुंडे, डॉ.अशोक तेजनकर, नरहरी शिवपुरे, संतोष जोशी, डॉ.सुहास अजगावकर यांनी अनुभव कथन केले तर तिसऱ्या सत्रात जल व्यवस्थापन - नागरी, ओद्योगिक पाण्याची विवेकी वापर, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण तंत्र, शेतीसाठी पाणी व्यवस्थापन आणि बदलत्या हवामानाला अनुकूल शेती, जलधोरणे आणि सरकारी योजना या विषयावर चर्चा झाली. यामध्ये डॉ.उपेंद्र कुलकर्णी, डॉ. अशोक तेजनकर, डॉ.दत्तात्रय रेगूलवार, डॉ.सुहास आजगावकर, प्रा.अश्विनी रांजणीकर, प्रा.कौशल्या लोंढे, नरहरी शिवपुरे, संतोष जोशी, अरविंद नरोडे, ॲड.राजेंद्र काळे, पराग सदगीर, ॲड. जयसिंग हिरे, सर्जेराव वाघ यांनी सहभाग घेतला.

# शिव महापुराण कथेत आज अनाथ मुलीचा 'शिवविवाह'

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

माजी उपमहापौर विजय औताडे यांच्या मातोश्रींच्या पुण्यस्मरणार्थ मागील २३ वर्षापासून प्रतिवर्षी भगवान बाबा बालीकाश्रामातील अनाथ मुलीचे पालकत्व स्वीकारलेली दत्तक कन्या शालिनी हिचा विवाह शुभम उद्धव कुलकर्णी यांच्याशी आज होणार असून बुधवारी (दि.१२) सकाळी ११ वाजता या भव्य शिवविवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी या दोन्ही वधू-वरास शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन पालकत्व स्वीकारलेले शिवमहापुराण कथेचे आयोजक माजी उपम हापौर विजय औताडे यांनी केले आहे. याप्रसंगी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, महंत शांतिगिरी महाराज, व साधू संत, लोकप्रतिनिधी, यांच्यासह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे.

**लाखो भक्तांच्या उपस्थितीत पंडित राघव मिश्रा देणार नववधू-वरास आशीर्वाद**

आज शिव महापुराण कथेचा समारोप...

ऐतिहासीक छत्रपती संभाजी नगर मध्ये ऐतिहासिक शिव महापुराण कथेचा ऐतिहासिक सोहळा ६ ते १२ दरम्यान शहरातील मयुर पार्क येथे आयोजित करण्यात आला होता. श्री कुबेरेश्वर धाम सिहोर चे पंडित राघवजी प्रदीपजी मिश्रा यांच्या वाणीतून शिव महापुराण कथा समस्त महादेव भक्तांनी लाखोंच्या संख्येत दुपारी १ ते ४ दरम्यान श्रवण केली.

आज बुधवारी (दि. ११) या कथेचे सकाळी ९ ते १२ दरम्यान आयोजन करण्यात आले असुन पंडित राघव प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेचा दुपारी १२ वाजता समारोप होणार असुन कथेच्या अर्धा तास अगोदर शिवभक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिव महापुराण कथेचे आयोजक विजय औताडे यांनी केले आहे.

६ मार्च रोजी टीव्ही सेंटर चौकातील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकास अभिवादन करून भव्य शोभायात्रेने या शिवमहापुराण कथेस प्रारंभ झाला होता. याकडे संपूर्ण शहराचे लक्ष वेधले होते. यावेळी शिवमहापुराण कथेतून ॐश्री शिवाय नमस्तुभ्य: चा जयघोष संपूर्ण शहरात दुमदुमल्याचे चित्र दिसून आले. ना भूतो ना भविष्यती असा हा हा सोहळा लाखोंच्या संख्येत महादेव भक्तांनी अनुभवला.

६ ते १२ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या शिवमहापुराण कथेत राज्यभरातून आलेल्या विविध संतांचे पूजन करण्यात आले. तब्बल दोन हजाराहून अधिक सेवेकरी यांनी आपली निस्वार्थ सेवा या शिवम हापुराण कथेत दिली. तर अनेक दानशूर म हादेव भक्तांनी अन्नदान करून सहकार्य केले.

आयोजन समितीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्राथमिक उपचार, अग्नीशामक यंत्रणा, सुलभ शौचालय, महिला सुरक्षा, अन्नदान, निवास व्यवस्था, यासह अत्यावश्यक सेवेसाठी भाविकांनी स्वतःहून पुढाकार घेतला. येणाऱ्या प्रत्येक भाविकांना चांगली सुविधा मिळावी या हेतूने या शिवमहापुराण कथेच्या परिसरात हजारो स्वयंसेवक सातही दिवस अहोरात्र कार्यरत होते असे विजय औताडे यांनी सांगून त्यांचे आभार व्यक्त केले. या शिवमहापुराण कथेत एक लाखाहून अधिक भाविक सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांना भोगवटा वर्ग २ जमिनींवर कर्ज मिळण्यासंबंधीचे परिपत्रक पुन्हा निर्गमित करणार- महसूल मंत्री

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांना विविध कामांसाठी देण्यात येणाऱ्या कर्जावर तारण म्हणून भोगवटा वर्ग दोनमधील जमीनी बँका, वित्तीय संस्थांकडे तारण ठेवण्यासंदर्भातील परिपत्रक यापूर्वीच निर्गमित करण्यात आले आहे. यासंबंधी वित्तीय संस्थांना माहिती व्हावी व शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यास सुलभता यावी यासाठी हे परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात येणार आहे. तसेच याची माहिती सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना द्यावी, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

देवस्थान इनाम वर्ग ३ (दुमाला), भोगवटा वर्ग २, रेघेखालील कुळ, प्रकल्पाकरिता राखीव इ. धारण प्रकार असणाऱ्या शेतजमिनीवर अल्प मध्यम व दीर्घ मुदत तसेच व्यावसायिक कर्ज वाटप करण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत म हसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्व. उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंह राजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, अपर जिल्हाधिकारी राजेंद्र मुठे, उपसचिव संजय धारुरकर, सत्यनारायण बजाज, सातारा जिल्हा बँकेचे अध्यक्ष खासदार नितीन पाटील, बँकेचे संचालक तथा माजी आमदार प्रभाकर घार्गे, राजेंद्र राजुपुरे, प्रदीप विधाते, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे आदी यावेळी उपस्थित होते. देवस्थान इनाम वर्ग ३ (दुमाला), भोगवटा वर्ग २, रेघेखालील कुळ, प्रकल्पाकरिता राखीव इ. धारण प्रकारच्या जमिनी तारण ठेवता येत नसल्याने या जमिनधारकांना विविध बँका, वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. त्यावर मार्ग काढण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

कर्ज मिळण्यासाठी इनाम जमिनी तारण ठेवण्यासंदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल. मात्र, भोगवटा वर्ग २ च्या जमिनी तारण ठेवणे, कर्ज थकित झाल्यास त्या जमिनी विक्री करणे, बोजा चढविण्याचे अधिकार बँकांना देण्यासंदर्भात महाराष्ट्र महसूल अधिनियमात तरतूद असून तथापि यासंबंधी बँकांना या संबंधी माहिती व्हावी आणि शेतकऱ्यांना कर्ज घेण्यास येणाऱ्या अडचणी दूर होऊन सुलभता यावी, यासाठी सर्व जिल्हाधिकारी यांनी ही तरतूद सर्व बँकांच्या निर्देशनास आणावी, अशा सूचना यावेळी श्री. बावनकुळे यांनी दिल्या.

# रस्ते अपघात रोखण्यासाठी 'अल्कोहोल' सोबतच आता 'ड्रग्स' सेवन तपासणीही करणार- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यामध्ये रस्ते अपघातांवर नियंत्रण मिळवून अपघाती मृत्यू रोखण्यासाठी शासन विविध उपाय योजनांची अंमलबजावणी करीत आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी पोलिसांमार्फत नियमितपणे वाहन चालकांची अल्कोहोल सेवन तपासणी करण्यात येते. मात्र यापुढे आता 'अल्कोहोल' सोबत ड्रग्स सेवनाची तपासणीही करण्यात येईल. ड्रग्स सेवन तपासणीच्या मशीन लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

राज्यात होणाया अपघातांच्या प्रमाणाबाबत सदस्य काशिनाथ दाते यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

या प्रश्नाच्या उत्तरात परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, देशभरात रस्ते अपघातांमध्ये वाढ होत आहे. त्यामध्ये मृत्यूचे प्रमाणही वाढत आहे. मात्र राज्यात मागील वर्षाच्या तुलनेत अपघाताचे प्रमाण .०२ टक्क्यांनी कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे अपघाती मृत्यूच्या प्रमाणातही मागील वर्षाच्या तुलनेत घट झाल्याचे दिसून येते. शासनाने जिल्हा नियोजन समितीचा एक टक्का निधी रस्ता सुरक्षेसाठी राखीव ठेवला आहे. या निधीच्या माध्यमातून रस्ता सुरक्षाविषयक विविध उपाययोजना, उपक्रम राबविण्यात येत आहेत.

वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी परिवहन विभागाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी विभागाने २६३ इंटरसेप्टर वाहनांची खरेदी केली आहे. चालक परवान्यांमध्ये अधिक कडक नियमावली अमलात आणण्यात येत आहे. राज्यात ३८ ठिकाणी ऑटोमॅटिक ड्राइविंग टेस्ट सुरू करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये ७० टक्के परवानाधारक अपात्र ठरले आहेत. यापुढे चालक परवान्यांमध्ये अचूकता येण्यासाठी ऑटोमॅटिक टेस्ट ट्रॅकचा उपयोग करण्यात येणार आहे. वाहतूक नियमांच्या उल्लंघन प्रकरणी दंड करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचाही उपयोग करण्यात येईल.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, रस्ते सुरक्षिततेसाठी राज्यातील ९ राष्ट्रीय महामार्गांवर आणि २१,४०० किमी महत्त्वाच्या रस्त्यांवर अपघातप्रवण क्षेत्रावर एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली उभारण्याचे प्रस्तावित आहे. ही आयटीएमएस प्रणाली पीपीपी पद्धती राबविण्यात येईल. नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी व रस्ता सुरक्षा विषय जनजागृती करण्यासाठी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. मुंबई शहरातील रस्ते अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन म हामंडळाच्या बसला किंवा बसशी संबंधित झालेल्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या मृतांच्या वारसांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते.

वन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने अपघातप्रवण स्थळे दुरुस्त करण्यात येतील. वाहतूक नियमांविषयी शालेय अभ्यासक्रमात यांसदर्भातील घटक समाविष्ट करण्याबाबत तपासणी करून कार्यवाही करण्यात येईल, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य अतुल भातखळकर, योगेश सागर, ज्योती गायकवाड, सुधीर मुनगंटीवार, गोपीचंद पडळकर, डॉ नितीन राऊत, अभिमन्यू पवार, आदित्य ठाकरे, विश्वजीत कदम यांनी सहभाग घेतला.

# एच. आर. महाविद्यालयातील अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत - नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

चर्चगेट येथील एच.आर महाविद्यालयातील अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असून कार्यान्वित असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य सुनिल शिंदे यांनी याविषयी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या. यावेळी चर्चेमध्ये सदस्य भाई जगताप यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाने नवीन आर्किटेक्टची नेमणूक केली असल्याचे सांगून नगरविकास राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, महाविद्यालयाने आता बांधकामाचा प्रस्ताव नव्याने सादर केला आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. याठिकाणी केलेल्या पाहणीम ध्ये काही बांधकामे अनधिकृत असल्याचे दिसून आले आहे. या अनधिकृत बांधकामांसंदर्भात चौकशी करून कडक कारवाई करण्यात येईल असेही राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले.

यासंबंधी सदस्यांनी बृहन्मुंबई म हानगरपालिकेशी पत्रव्यवहार केला असता त्याचे उत्तर इंग्रजीमध्ये देण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावर पर्यटन मंत्री शंभुराज देसाई म्हणाले की, मराठी ही राज्यभाषा असून इंग्रजीमध्ये उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांना कडक समज देऊन उत्तर मराठीमध्ये देण्याविषयी आदेश देण्यात येतील.

# खुलताबाद तालुक्यातील झरी येथील एका मागासवर्गीय समाजाची महिलांना मारहाण झाल्याची तक्रार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तब्बल १५ दिवसापासून न्यायासाठी अनेक वेळा खुलताबाद पोलीस स्टेशन तक्रार दाखिल करण्यासाठी झरी येथील मागासव र्गीय समाजाची महिलेच्या तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ केली जात होती. प्रकरणात अखेर ग्रामीण पोलिस अधीक्षकांच्या यांच्याकडे आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकारांना गुन्हा दाखल करण्याचे मागणी केली होती खुलताबाद तालुक्यातील झरी गावात एका मागासवर्गीय समाजाची महिलेला मारहाण, जातिवाचक शिवीगाळ आणि धमक्या दिल्याच्या प्रकरणात अखेर खुलताबाद पोलिसांनी तक्रारीची गंभीर दखल घेतली आहे. ग्रामीण पोलिस अधीक्षकांच्या आदेशा नंतर,आकाश रामदास लोंढे, उषा राम दास लोंढे आणि पूजा आकाश लोंढे यांच्या विरोधात खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटना २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ४ वाजता घडाली होती पीडित महिलेने लगेचच खुलताबाद पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मात्र, पोलिसांनी सुरुवातीला तिच्या तक्रारीची दखल घेतली नाही. त्यामुळे या महिलांनी थेट ग्रामीण पोलिस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली. या प्रकारांना एका सामाजिक संघटनांनी या प्रकरणी पाठपुरावा करून न्यायाची मागणी केली. अखेर पोलिस अधीक्षकांच्या आदेशा नंतर खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणात आंबेडकर वादी संघर्ष समितीने मोठ्या प्रमाणात संघर्ष केला.त्यांनी पोलिस अधीक्षक यांना निवेदन देऊन आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. अखेर समितीच्या संघर्षाला यश आले असून, आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणात भारतीय न्याय संहिता २०२३/व अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ अंतर्गत शिवीगाळ आणि धमकी,गंभीर दुखापत करण्याचा प्रयत्न, मारहाण,अनुसूचित जाती-जम ाती(अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणाचा पुढील तपास उप विभागीय पोलिस अधिकारी विजय कुमार ठाकूरवाड करत आहेत.

विशेष म्हणजे एका दैनिकाचे पत्रकार खुलताबाद पंचायत समिती कार्यालयात एका तक्रारी संदर्भात माहिती संकलन करण्यासाठी गेले होते. माहिती ना देत कार्यालय बाहेर जहा असे सांगितले पत्रकार यांनी शासकीय कार्यालय आहे या कोणाची खाजगी मालमत्ता नाही असे सांगितले यांनी त्यांच्या विरोधात खुलताबाद पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळे आले म्हणून खोटे नाटे गुन्हा दाखल केले. विशेष म्हणजे या पत्रकार ने खुलताबाद तालुक्यात सुरू असलेले अनेक ठिकाणी सुरू असलेले अवैध धंद्याचे संदर्भात आपल्या लेखणीचे माध्यमातून नेहमी बातम्या छापून अवैध धंद्या संदर्भात खुलताबाद पोलीस ठाण्याचे हद्दीत सुरू असलेले अवैध धंदे माध्यमातून खुलताबाद पोलिसांचे पत्ते उघडे करत होते. याच्या राग खुलताबाद पोलिसांना होते या अनुषंगाने खुलताबाद पोलिसांनी कोणतेही चौकशी न करता खोटे गुन्हे दाखल करून घेतले होते.. मात्र पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण वाढले

पत्रकार यांची तक्रार घेण्यास ठाणे अंमलदार टाळाटाळ केली. मात्र खुलताबाद तालुक्यातील झरी येथील एका मागासवर्गीय महिलांना मारहाण झाल्याची तक्रार तब्बल १५ दिवस लागले गुन्हा दाखिल करण्यासाठी यासंदर्भात आंबेडकरीवादी संघर्ष समितीचे पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण पोलीस अधीक्षक विनाय कुमार राठोड यांचेकडे निवेदन देताच दहा मार्च रोजी खुलताबाद पोलीस ठाण्यामध्ये या प्रकरणात गुन्हा दाखल केले आहे.

# ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे नळविहिरा येथे चर्चासत्र संपन्न

**जालना**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**




जालना जिल्ह्यातील ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला आयोजिण्यात येणारे मार्च महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र रविवार (दि. ९ मार्च ) रोजी जाफराबाद तालुक्यातील मौजे नळविहिरा येथील पाटील कृषी फार्मवर अत्यंत उत्साहात पार पडले.

यावेळी ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रम ुख श्री. संजय मोरे पाटील, कृषी सहाय्यक श्रीमती ज्योती शिंदे, नाशिकचे श्री. सुनिल रौदळ, वालसाचे डॉ. गणेश पाटील पोटे, सिनगाव जहागीरचे श्री. संदीप बंगाळे, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, अकोला देवचे श्री. सुधीर जोशी यांनी गटशेती व शेती क्षेत्रातील आप - आपले अनुभव कथन केले.

यावेळी मुंबई निवासी ज्ञानदेव पाटील गाडेकर, बबन थुट्टे, युवराज मोरे आदी उपस्थित होते. यावेळी शिवार फेरीही झाली. भू प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात होऊन वन भोजनाने सांगता झाली.

# सहा वर्षाच्या मोहम्मद शाफे जागीरदार याचा जीवनातील पहिला रोजा



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरातील उद्योजक अँड.मतीन सेठ जागीरदार यांचा सहा वर्षीय मुलगा मोहम्मद शाफे जागीरदार यांने पवित्र रमजान महिन्यातील आपल्या जीवनाचा पहिला रोजा पूर्ण केला त्याबद्दल शुभेच्छांचा त्याच्यावर वर्षाव होत आहे त्याला आजोबा मोहम्मद युनूस अथर जागीरदार,मोहम्मद जुनेद, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश एम एम वली मोहम्मद, अँड. मुस्तकीम कामरानोद्दीन, कारी हमीद साहब. यांचे सह सर्व नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे

# प्रतिबंधात्मक आदेश

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७(३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.२४ मार्चपर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# गौण खनिज:अवैध उत्खनन व वाहतूक रोखणार स्थिर पथके; ३९ ठिकाणी पथके तैनात करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात गौण खनिजाची होत असलेले अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी स्थिर पथके व चेक पोस्ट तयार करण्याचे निर्दे श जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले असून गौण खनिज उत्खनन होण्याच्या शक्यता असलेल्या जागांच्या मार्गांवर हे पथके तैनात करण्यात यावेत असे स्पष्ट केले असून जिल्ह्यात ३९ ठिकाणी हे पथके तैनात करण्यात येतील, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी किशोर घोडके यांनी दिली आहे.

जिल्ह्यात दि.१ एप्रिल २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत एकूण २०८ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणामध्ये कारवाई ३ कोटी ९१ लाख ८२ हजार रुपये इतका दंड आकारण्यात आला असून २ कोटी ४१ लाख १६ हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. या कारवायांमध्ये २७ गुन्हे दाखल करण्यात आले असून ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच १९९ वाहने व ४ यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली आहे. जिल्ह्यात अवैधरीत्या होत असलेले गौण खनिज उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी कारवाई करण्यासाठी सर्व तालुक्यात विविध ठिकाणी गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यासाठी स्थिर पथकांची स्थापना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये अवैध गौण खनिज व वाहतुक करणाऱ्या वाहनांवार कारवाई करण्याकामी तालुक्यातील महत्वाच्या ठिकाणी स्थिर पथके, चेक नाके तयार करण्यासाठी त्या त्या तालुक्यातील ठिकाणे कळविण्यातबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार तहसिलदार कार्यालयाच्या अखत्यारीतील स्थिरपथके तपासणी नाके याप्रमाणे-

अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर - नगर नाका, छावणी , वाल्मी नाका पैठण रोड

तहसिल कार्यालय (ग्रामीण ) - कॅंब्रीज शाळा चौफुली, जालना रोड, चिकलठाणा, सावंगी टी पॉंईट, जळगाव रोड सावंगी, पिसादेवी पळशी चौफुली, सावंगी - कॅंब्रीज शाळा बायपास रोड, पिसादेवी , करमाड राजा प्रिंप्री टी - पॉंईट, करमाड पोलीस स्टेशन जवळ, करमाड, झाल्टा फाटा टी पॉंईट, बीड बायपास रोड झाल्टा

तहसिल कार्यालय पैठण - पैठण शेवगाव रोडवर बलदवा माळा, मौजे - पैठण हद्द, पैठण-छत्रपती संभाजीनगर रोडवर, हॉटेल सह्याद्री चौक, आपेगाव रोड कमान, शेवगाव रोड, नाथ मंदिराच्या पाठीमागे गोदावरी नदी, मौजे - चनकवाडी, मौजे - पाटेगाव

**तहसिल कार्यालय फुलंब्री - पाल फाटा- किनगाव फाटा**

तहसिल कार्यालय वैजापूर - पुरणगाव, सावखेडगाव, नागमठाण, झालेगाव, लाखणी, लासुरगाव तहसिल कार्यालय गंगापूर - जामगांव, वाहेगाव, आसेगाव, लिंबेजळगाव टोल नाका.

तहसिल कार्यालय कन्नड - नेवपूर, देवळी

तहसिल कार्यालय खुलताबाद- खुलताबाद - फुलंब्री रोड वरील काटशेवरी फाटा, धुळे-सोलापूर हायवे वरील वेरुळ या ठिकाणी

तहसिल कार्यालय सिल्लोड - भराडी पेट्रोल पंप नाका सिल्लोड, डॉ. बाबासाहेब आबेडकर चौक, संभाजीनगर नाका सिल्लोड, भोकरदन फाटा, कोटनांद्रा बोरगाव बाजार, पिरोळा फाटा, सिसारखेडा भराडी, पंप धानोरा फाटा, वांजोळा फाटा, केऱ्हाळा फाटा, निल्लोड फाटा, भवन व चिचंखेडा, बनकिन्होळा, कायगाव, तांडा, बाजार, गव्हाली तांडा, बोरगाव, कासारी, डोंगरगाव, मंगरुळ अन्वी, १२ नंबर फाटा पालोद, गोळेगाव बु शिवणा, अंजिठा, अंभई हट्टी उंडणगाव.

तहसिल कार्यालय पैठण - वाळूघाट हिरडपुरी

जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांना त्यांच्या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व वेळोवेळी पोलीस विभागाच्या मदतीने नेमून दिलेल्या ठिकाणी गौण खनिज वाहतूक करणाया वाहनांची तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारी वाहने आढळल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम -१९६६ चे कलम ४८(७) (८) गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरीता करावयाचे उपाय योजना बाबतचे दि.१४ जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत वाळू निर्गती धोरण दि.१६ फेब्रुवारी २०२४ नुसार दंडात्मक कारवाई करावी. तसेच तहसीलदार यांचेशी संपर्क करुन वाहन कार्यालयात जमा करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. या कारवाईचा अहवाल दररोज जिल्हाधिकारी कार्यालयात मागविण्यात येणार आहे. जिल्हयात होणारी अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी कर्तव्या बजावून केलेल्या दैनंदिन कार्यवाहीच्या अहवाल नियमितपणे जिल्हाधिकारी कार्यालय ई-मेलद्वारे करण्यातबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

# देवगिरी महाविद्यालयात ‘एन.आय.एस.एम. अंतर्गत राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा (एन.एफ.एल.क्यू.) २०२५ साठी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



देवगिरी महाविद्यालयात दिनांक १०/०३/२०२५ रोजी वाणिज्य विभागा व एन.आय.एस.एम. अंतर्गत राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा (एनएफएलक्यू) २०२५ प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला.

राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर अशोक तेजनकर तर प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री प्रभाकर उदावंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना डॉ. राजेश लहाने यांनी सदरील कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांनी एनआयएसएम राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा (एनएफएलक्यू) प्रशिक्षणात सहभागी व्हावे तसेच हा वित्तीय कौशल्य विकसित करणे, त्यांना आर्थिक साक्षर बनविणे हा आहे.

राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा प्रशिक्षण कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रभाकर उदावंत यांनी सदरील राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा ही राष्ट्रीय पातळीवर घेण्यात असून तिचा प्रमुख उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करणे आणि जास्तीत जास्त देश पातळीवरील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे हा आहे. सदरील स्पर्धा देशपातळीवर तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येणार आहे. प्रथम ऑनलाइन स्क्रीनिंग प्रश्नमंजुषा नंतर देशपातळीवरील सात विभागीय प्रादेशिक स्तरावर आणि शेवटी प्रादेशिक फेरीतील सर्वोत्तम स्पर्धक महाअंतिम राष्ट्रीय स्तरावर (ग्रँड फिनाले) प्रश्नमंजुषा फेरी घेण्यात येणार आहे. यावर्षी सदरील स्पर्धे साठी आकर्षक बक्षिसे, रोख बक्षीसे, ट्रॉफी, प्रमाणपत्रासह एकूण २१ लाख रुपये किमतीची बक्षिसे देण्यात येणार आहेत अशी माहिती दिली आणि प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शंका दूर केल्या.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. अशोक तेजनकर सर यांनी राष्ट्रीय आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा शिक्षण कार्यक्रम वाणिज्य विभागाने आयोजित केल्याबद्दल सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

सदरील प्रश्नमंजुषा कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन एन आय एस एमच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या. अंतिम मुदतीपूर्वी स्वतःची किंवा तुमच्या टीमची नोंदणी करा, विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषाचा सराव करावा आणि अव्वल स्थानासाठी ध्येय ठेवा. तुम्हाला यश निश्चितच मिळेल.

सदरील कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे डॉ. रवी पाटील आणि डॉ. गणेश मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील प्रशिक्षणासाठी वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेतील ३५९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यशाळेसाठी समन्वयक म्हणून डॉ. राजेश लहाने यांनी कार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास ठोंबरे यांनी केले तर डॉ. अविनाश धोत्रे यांनी आभार मानले.

# महिला फार्मासिस्टांसाठी ‘उंच माझी भरारी’ हा विशेष कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जागतिक महिला दिनानिमित्त, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल आणि दि औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने, महिला फार्मासिस्टांसाठी ‘उंच माझी भरारी‘ हा विशेष कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून मा. सौ. मंजिरी घरत (प्राचार्य, के. एम. कुंदनानी फार्मसी कॉलेज; माजी उपाध्यक्ष, IPA आणि FIP) आणि मा. सौ. वसुंधरा जक्का (कॉर्पोरेट ट्रेनर) यांची उपस्थिती लाभली.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून ॲडव्होकेट आशा शेरखाने-कटके (अध्यक्ष, बाल कल्याण समिती, छत्रपती संभाजीनगर) आणि डॉ. अर्चना राठोड-पवार (प्रोफेसर व प्रमुख, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, छत्रपती संभाजीनगर) यांनी उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. व्यासपीठावर औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री. नंदकिशोर काळे, सचिव श्री. विनोद लोहाडे आणि छत्रपती संभाजीनगर रेल्वे कृती समिती व मसिआ पदाधिकारी श्री. अनंत बोरकर उपस्थित होते. मा. सौ. मंजिरी घरत यांनी जागतिक स्तरावर महिला फाम ासिस्ट आरोग्य व्यवस्थेतील म हत्त्वपूर्ण भूमिकेबाबत मार्गदर्शन केले.

ॲडव्होकेट आशा शेरखाने-कटके यांनी महिलांचे हक्क, संधी आणि सायबर कायद्यांची माहिती दिली. डॉ. अर्चना राठोड-पवार यांनी महिलांच्या आरोग्यविषयक मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. म नोहर कोरे (सदस्य, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल) यांनी चडउऊअ आणि अखजउऊ चे अध्यक्ष, मा.श्री जगन्नाथजी शिंदे (आप्पासाहेब) यांच्या मार्गदर्शनाखाली कौन्सिलद्वारे फार्मासिस्टांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षण उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी हेही स्पष्ट केले की, एक महिला फार्मासिस्ट प्रशिक्षित असेल, तर संपूर्ण समाज आरोग्याच्या दिशेने पुढे जातो.

संघटनेचे सचिव श्री. विनोद लोहाडे यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या, तर उपाध्यक्ष श्री. नंदकिशोर काळे यांनी संघटनेच्या भूमिकेचे म हत्त्व विशद केले.

या कार्यक्रमास आयुर्वेदिक रिसेलर असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री. शेखर खोले यांची विशेष उपस्थिती होती. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फार्मासिस्ट महिलांसाठी असा पहिलाच विशेष कार्यक्रम संपन्न झाला.

संधी, प्रेरणा, मार्गदर्शन आणि उत्साहाचा संगम असलेल्या या कार्यक्रमास १०२ हून अधिक महिला फार्मासिस्ट उपस्थित होत्या. ड्रग इन्फॉर्मेशन सेंटरच्या सौ. विनया कुलकर्णी यांनी तांत्रिक बाजू सक्षमपणे हाताळली. महिला विंगच्या जबाबदारी यशस्वीरीत्या सौ. मंजुषा झिंजुर्डे, सौ. संगीता अंबादास सोनवणे, सौ. जयश्री बोरसे आणि सौ. मनीषा कुलकर्णी यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा गोसावी व सोनाली कळम यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. शीतल पांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सदस्य, तसेच प्रोजेक्ट चेअरमन श्री. वसंत भराड, श्री. शेख रईस, श्री. विनोद ठोंबरे आणि श्री. ज्ञानेश्वर वाघलव्हाळे यांनी मोलाचे योगदान दिले.

# शियान अहमद यांनी आपल्या जीवनातील वयाच्या सहाव्या वर्षी पहिला रोजा पूर्ण



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरातील आजामशाहीपुरा येथील शियान अहमद या सहा वर्षाच्या चिमुकल्यांने इस्लाम धर्मात पवित्र मानला जाणारा रमजान महिन्याचे रोजा उपास, शियान अहमद यावर्षाच्या वाघ्या साह वर्षाच्या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला उपास (रोजा) पूणी केले. विशेष म्हणजे या सहा वर्षाच्या मुलगा शियान अहमद पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या अवघ्या सहा वर्षाच्या चिमुकल्याने दमछाक करणाऱ्या कडक उन्हाळ्यातही तब्बल १४ तासांचा निर्जल्य पद्धतीचा उपवास ठेवल्याने त्याचे कौतुक केले जात आहे. या उष्णतेचा मोठ्या माणसांना देखील खूप त्रास होतो त्यात या सहा वर्षीच्या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातले पहिला रोजा ठेवून आपल्या आयुष्याची सुरुवात एक चांगल्या प्रकारे व्हावी या हेतूने उपवास ठेवला. त्यामुळे या शियान अहमद छोट्याशी मुलाचे कौतुक.

हजरत जर जरी जर बक्ष कमिटीचे सदस्य वडील शेख कामरानोद्दीन. आजोबा,तकिउद्दीन इफ्तेकारुद्दीन, सरफराजोद्दीन सलीमोद्दीन गुफरानोद्दीन यांचे सह सर्व नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

# महाबोधी विहार मुक्ती आंदोलनात राजकीय नेत्यांना चंचू प्रवेश करू देऊ नका- नारायण बागडे!



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जेव्हा जेव्हा आमच्या राजकीय नेत्यांनी लोक आंदोलनात चंचू प्रवेश केला तेव्हा तेव्हा आंदोलनाचा सत्यानाश केला हा आजपर्यंतच्या अनूभव आहे आता तरी महाबोधी विहार मुक्ती आंदोलनात या नेत्यांना प्रवेश घेवू देऊ नका असा गंभीर इशारा नारायण बागडे यांनी दिला महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाला समर्थन देताना ते बोलत होते.

बागडे यांनी आपला अनुभव सांगितले नामांतर, रमाबाई घाटकोपर, रिडल्स, इत्यादी आंदोलने हे आंबेडकरी जनतेच्या रेट्यामुळे झाले परंतु या रेट्यात कितेक नेत्यांनी आपले हात धुवून टाकले महाबोधी विहार मुक्ती आंदोलन हे देशाचेच नव्हे तर संपूर्ण जगातील बोद्ध अनुयायी यांच्या अस्मितेचे आहे या आंदोलनाची धग फक्त बौद्धांच्या हाती राहू द्या तरच हा लढा आपण जिंकू असे आवाहन बागडे यांनी केले आहे.

# महाबली शहाजीराजे भोसले यांची ४३१ जयंती वेरूळ येथे मोठ्या उत्साहात होणार संपन्न

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



तालुक्यातील वेरूळ येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज जयंती महोत्सव २०२५ वार्षिक महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे या संदर्भात आज मालोजीराजे भोसले गढी खुलताबाद तालुक्यातील श्रीक्षेत्र वेरूळ येथे अनेक शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये राजेंद्र पवार यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली नियोजन बैठक संपन्न झाली.

बैठकीचे प्रास्ताविक बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष योगेश टोपरे यांनी केले यावेळी पुंजाजी अण्णा, महेश उबाळे, प्रकाश वाकळे,गणेश नाना अधाने, शिवम सोनवणे अशा अनेक शिव भक्तांनी मनोगतात सांगितले की शहाजीराजे महाराज जयंती मोठ्या संख्येने उत्साहात साजरी करायची आहे त्यासाठी जी जबाबदारी आमच्यावर येईल तीपार पाडण्यास आम्ही तयार आहोत जागतिक दर्जाचा विकास या गढीचा होणे गरजेचे आहे यासाठी भरीव निधीची तरतूद शासनाने करावी आणि येथे शहाजीराजे महाराजांचा तसेच भोसले घराण्याचा इतिहास सांगणारे भव्यदिवे म्युझियम तयार व्हावे असे मत अनेकांनी मांडले. यावेळी कार्यकारणी पुढीलप्रमाणे निवडण्यात आले स्वागत अध्यक्ष प्रकाश पाटील मिसाळ माजी सरपंच वेरूळ गाव, उपाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, कृष्णा पाटील डोणगावकर, संतोष माने, सचिन पवार, गणेश नाना आधाने, परसराम बारगळ, प्रकाश वाकळे, राजू वरकड, एल जी गायकवाड, अनिल श्रीखंडे, महेश उबाळे, अनिल चव्हाण विशाल खोसरे नियोजनाच्या संदर्भात म ार्गदर्शन करताना राजेंद्र पवार म्हणाले की स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज जयंती महोत्सव सार्वजनिक सहभागाने साजरा करण्याची सुरुवात केली यामागचा माझा मूळ हेतू स्वच्छ होता की ज्या भूमीतून स्वराज्याचे स्पुलिंग पेटवल्या गेले ते महाबली महापराक्रमी शहाजीराजे महाराज यांच्या वास्तव्याने मासाहेब जिजाऊंच्या पदस्पर्शाने पावन असलेली ही भूमी भोसले घराण्याचे उगमस्थान आहे अठरापगड जातीला सोबत घेऊन स्वराज्याची संकल्पना इथूनच उदयास आली जाती भेद विसरून एकोपा आणि राष्ट्र निर्मितीची संकल्पना मुळातच शहाजीराजे महाराजांची आहे म्हणूनच या भूमीची शिकवण सर्वांच्या पर्यंत पोहोचवणे हे आपलं सर्वांचं कर्तव्य आहे जेणेकरून भेदाभेद विरहित क्लेश विरहित राष्ट्रनिर्मितीची महामानवांची संकल्पना पूर्ण होण्यासाठी मालोजीराजे भोसले गढी तथा शहाजीराजे महाराज यांचे विचार समाजापर्यंत पोहोचण्यासाठी हा जयंती महोत्सव जनसामान्यापर्यंत पोहोचवून भोसले गढीवर हा सोहळा लोकोत्सव व्हावा हीच प्रामाणिक भावना आहे ज्या ज्या ठिकाणी भोसले घराण्यांचं वास्तव्य झालं भोसले घराण्यातील ज्या ज्या महापुरुषांच्या समाध्या वास्तव्याचे ठिकाण आहे.

तेथे विकास होणे गरजेचे आहे हेच अंतिम ध्येय आपलं असलं पाहिजे त्यासाठी शिवभक्त म्हणून आपण आणि सरकार सोबत येऊन काम करूया ४३१ वी जयंती साजरी करत असताना अनेक मान्यवर अभिवादनासाठी येणार आहेत १७ मार्चला संध्याकाळी ४ हजार ३१ दिव्यांचा भव्य दीपोत्सव संध्याकाळी ७ वाजेला भोसले गढीवर संपन्न होईल १८ मार्च सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या शुभहस्ते शहाजीराजे महाराज यांना अभिवादन करण्यात येईल. मान्यवरांच्या शुभहस्ते दोन दिवसीय शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन मार्गदर्श संपन्न होईल अशा भव्य दिव्य स्वरूपात जयंती महोत्सव संपन्न होणार आहे अशी माहिती स्वराज्य संकल्पक शहाजीराजे जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी दिली. बैठकीसाठी आलेल्या शिवभक्तांचे आभार परसराम पाटील बारगळ यांनी मानले याप्रसंगी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी किशोर काळे, संजय वैद्य, विजय भालेराव, कडुबा सोष्टे, मदन राठोड सागर पाटील मतकर, परसराम बारगळ, योगेश टोपरे, मोहन गवळी, प्रकाश वाकळे, शुभम सोनवणे, महेश उबाळे, मूलचंद चव्हाण, राजू चव्हाण, विनोद ढीवरे, अरुण गोल्हार, गणेश काजे, अप्पाराव नागे, जनार्दन अधाने, शिवा अंभोरे, संजय श्रीखंडे, एकनाथ जाधव, विलास काळे, संदीप मोडके, गणपतराव म्हस्के दयानंद पाटील फुलारे यासह अनेक शिवभक्तांची उपस्थिती नियोजन बैठकीला होती.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**